ePaper

वर्ष - 9 । अंक -61 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com । शनिवार, दि. 25 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या हस्ते "मोदीज मिशन " पुस्तकाचे प्रकाशन



### आतील पानांत


- 'माझ्या बोटांची हालचालच होईना
- चेल्सीच्या विजयात युवकांची चमक
- मुख्यमंत्रीपदासाठी तेजस्वीचे नाव
- खा. घरातील सामान बाहेर फेकलं


## भाजपच्या रणनीतीत बदल | ठाकरेंच्या एकीचा शिंदेंना डबल फायदा

# ठाणे-मुंबईत भाजप बॅकफूटवर!

## उद्धव-राज ठाकरे युतीची शक्यता वाढली; मुंबई-ठाण्यातील समीकरणे ढवळून निघाली

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**महाराष्ट्रातील राजकारणात ठाकरे बंधूंच्या एकीची चर्चा पुन्हा चव्हाट्यावर आली आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे या दोघांच्या अलीकडच्या भेटींनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेवून ठाकरे घराण्याने पुन्हा 'एकत्र येण्याचा' प्रयत्न सुरू केल्याचं बोललं जात आहे. या पार्श्वभूमीवर महायुतीतील सर्वात मोठा घटक असलेल्या भाजपनंही आपली भूमिका मवाळ केली आहे. ठाकरे बंधूंच्या एकीचा थेट फायदा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना मिळत असून, त्यांचा ठाणे-मुंबई या दोन बालेकिल्ल्यांवर पुन्हा प्रभाव वाढताना दिसतो आहे.**





### मुंबई आणि ठाण्यातील राजकीय वातावरण तापले...

ठाकरेंच्या संभाव्य एकीमुळे राज्यातील राजकारण पुन्हा एकदा नवे वळण घेत आहे. भाजपला आपली 'बिग ब्रदर' इमेज बाजूला ठेवून सहकार्यातील संतुलन साधावं लागतंय. उद्धव आणि राज ठाकरेंच्या वाढत्या जवळिकीचा थेट फायदा शिंदेंना मिळताना दिसतोय. त्यामुळे महापालिका निवडणुका सुरू होण्यापूर्वीच मुंबई आणि ठाण्यातील राजकीय वातावरण चांगलंच तापले आहे.

ठाकरेंच्या एकीने बदललेलं समीकरण विधानसभा निवडणुकीत ठाकरे आणि शिंदे यांच्यातील संघर्षानंतर दोन्ही पक्षांना मोठा धक्का बसला होता. महायुतीला बंपर यश मिळाल्यानंतर जरी सत्ता स्थिर दिसत असली, तरी अनेक ठिकाणी भाजप, शिंदेसेना आणि मनसे या तिन्ही पक्षांमध्येच थेट लढत होण्याची शक्यता आहे. या सगळ्यात ठाकरे बंधू एकत्र आले, तर मराठी मतं मोठ्या प्रमाणावर त्यांच्या बाजूने जाण्याची भीती भाजपला आहे. यामुळे भाजपने आपल्या पारंपरिक 'आक्रमक' भूमिकेतून सॉफ्ट टोन स्वीकारला आहे.

#### भाजपची भूमिका बदलतेय

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर वर्षा निवासस्थानी पत्रकारांशी अनौपचारिक संवाद साधला. त्यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितलं की, "मुंबई महापालिकेत भाजप १०० पेक्षा अधिक जागा जिंकेल, पण महापौर पदासाठी आम्ही केवळ आकड्यांवर दावा करणार नाही." त्यांनी पुढे म्हटलं, "महापौर शिंदे यांच्या पक्षातूनही होऊ शकतो." या विधानाने राजकीय वर्तुळात चर्चा रंगली आहे. कारण ठाकरे-राज एकीची शक्यता जशी वाढते आहे, तशीच भाजप-शिंदे युतीसाठी आव्हानेही वाढतात. फडणवीस यांनी अप्रत्यक्षपणे शिंदे यांना महापालिकेतील प्रमुख भूमिकेचं ग्रीन सिग्नल दिल्याचं मानलं जात आहे.

#### मुंबईत भाजपचा 'बॅकफूट'

मुंबई महानगरपालिकेवर गेली अनेक दशके ठाकरे कुटुंबाचं वर्चस्व आहे. उद्धव ठाकरे यांच्या काळात बाळासाहेबांचा वारसा जपण्यात त्यांनी यश मिळवलं, मात्र विभाजनानंतर तेच समीकरण ढासळलं. आता उद्धव आणि राज ठाकरेंची जवळीक वाढल्यामुळे 'मराठी अस्मिता' पुन्हा केंद्रस्थानी येण्याची शक्यता आहे. ठाकरेंची एकी जर प्रत्यक्षात आली, तर मुंबईतील मराठी मतदार पुन्हा एकत्र होऊ शकतात. अशा परिस्थितीत भाजपला शिंदे यांच्या खांद्यावर बंदुकी ठेवावी लागणार आहे. त्यामुळे मुंबईत भाजपने 'दोन पावलं मागे' घेतल्याचं सूत्रांनी सांगितलं आहे.

#### ठाण्यात शिंदेंचा 'जॅकपॉट'

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा गड असलेल्या ठाण्यात भाजपनं 'स्वबळावर' लढण्याऐवजी आता शिंदेंकडे सूत्रं सोपवली आहेत. मागील महापालिका निवडणुकीत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने तब्बल ६७ जागा जिंकल्या होत्या, तर भाजप केवळ २३ जागांवर समाधान मानावं लागलं होतं. या वेळी मात्र परिस्थिती वेगळी आहे. ठाकरे बंधूंच्या एकीमुळे ठाण्यात महाविकास आघाडी आणि मनसे यांचं समीकरण मजबूत होतंय. त्यामुळे भाजपला शिंदेंसोबतचं गठबंधन टिकवणं भाग पडलं आहे. फडणवीस यांनीही हे समीकरण लक्षात घेऊन म्हटलं, "ठाण्यातील निर्णय शिंदे घेतील." या विधानाने स्पष्ट संकेत दिले गेले आहेत की ठाण्याचा 'कंट्रोल' आता पूर्णपणे शिंदेंकडेच आहे.

#### भाजपमध्ये नाराजीची कुजबुज

भाजपचे काही नेते मात्र या बदलत्या भूमिकेबद्दल नाराजी व्यक्त करत आहेत. मंत्री गणेश नाईक आणि आमदार संजय केळकर यांचा आग्रह आहे की ठाण्यात भाजपने स्वतंत्र लढावं. त्यांनी "अब की बार ७० पार" असं घोषवाक्य दिलं आहे. मात्र फडणवीस यांच्या भूमिकेमुळे या नेत्यांचा उत्साह कमी झाल्याचं दिसत आहे. पक्षाच्या उच्चस्तरीय बैठकीतही या नाराजीचा सूर उमटला आहे. मात्र फडणवीस आणि शिंदे या दोघांच्या मजबूत समीकरणामुळे भाजपचा स्थानिक स्तरावरील विरोध फारसा महत्त्वाचा ठरणार नाही, अशी शक्यता आहे.

#### महापालिकांमध्ये युतीचं गणित

फडणवीस यांनी सांगितल्याप्रमाणे, मुंबई महानगर प्रदेशातील (एमएमआर) ९ पैकी ४ महापालिकांमध्ये भाजप आणि शिवसेना शिंदे गट एकत्र लढणार आहेत. ठाण्यात शिंदे, तर नवी मुंबईत गणेश नाईक निर्णय घेतील. या रणनीतीमुळे भाजपनं 'सर्व निर्णय स्थानिक नेतृत्वावर सोपवण्याची' भूमिका घेतल्याचं दिसून येतं. ही भूमिका एकीकडे मवाळ असली, तरी ती महायुतीतील संतुलन टिकवण्याचा प्रयत्न असल्याचं मानलं जातं. ठाकरे-राज समीकरणामुळे निर्माण झालेल्या संभाव्य 'मराठी लाटे'ला उत्तर देण्यासाठी भाजपने शिंदेंना पुढे केलं आहे.

#### राजकारणाचा नवा टप्पा

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटी गेल्या काही महिन्यांपासून वाढल्या आहेत. दोघेही मराठी मतदारसंघ पुन्हा एकत्र आणण्याच्या प्रयत्नात असल्याचं सूत्रं सांगतात. विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर उद्धव ठाकरेंच्या समोर पक्षसंघटन मजबूत करण्याचं आव्हान आहे, तर राज ठाकरेंना मनसेला नवसंजीवनी देण्याची संधी दिसते आहे. या दोघांच्या हातमिळवणुकीचा परिणाम सर्वाधिक मुंबईत आणि ठाण्यात दिसणार आहे — आणि या दोन्ही ठिकाणी शिंदे हेच निर्णायक भूमिका बजावणार आहेत.

महामार्गांवर कोंडी

पर्यायी मार्गांचा अवलंब करण्याच्या सूचना

# दिवाळीनंतर पुण्यात परतण्याची लगबग

## महामार्गावर वर्दळ वाढण्याची शक्यता



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळीत मूळगावी गेलेले नागरिक पुणे, मुंबईकडे परतण्यास शुक्रवारपासून (२४ ऑक्टोबर) सुरुवात होणार आहे. गावाहून परतणाऱ्या नागरिकांच्या मोटारी, खासगी बसमुळे महामार्गांवर वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महामार्ग पोलीस, पुणे पोलीस, तसेच पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या वाहतूक विभागाने वाहनचालकांना महामार्गालगतच्या पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अवलंब करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.**

पुणे, मुंबईत नोकरी, व्यवसायानिमित्त अनेकजण वास्तव्यास आहेत. पुण्यात शिक्षणानिमित्त मोठ्या संख्येने विद्यार्थी वास्तव्यास आहेत. दिवाळी संपल्यानंतर २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान महामार्गावरील वर्दळ वाढण्याची शक्यता आहे. परगावाहून, तसेच परराज्यातून अनेकजण पुणे-मुंबईकडे रवाना होणार आहे. या पार्श्वभूमीवर महामार्ग पोलीस दलाचे पुणे विभागाचे पोलीस अधीक्षक विक्रांत देशमुख, पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी वाहनचालकांना आवाहन केले आहे.मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, तसेच बाह्यवळण मार्गावरील वर्दळ वाढणार आहे. कोल्हापूरहून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मीरा भाईंदरकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या जास्त असणार आहे. नाशिक-पुणे महामार्गावरील चाकण परिसरातून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतुकीचा वेग संथ होण्याची शक्यता आहे. सोलापूरहून पुण्याकडे मोठ्या संख्येने वाहने येणार आहेत. या पार्श्वभूमीवर वाहनचालकांनी शक्यतो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा. मोटारी, खासगी बसने पुण्याकडे येणे टाळावे. महामार्गावरील गर्दी आणि कोंडी विचारात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे. २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत प्रवास टाळावा. महामार्गालगतच्या पर्यायी मार्गांचा वापर करावा. पोलिसांनी दिलेल्या नियमांचे आणि सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पोलिसंकडून करण्यात आले आहे.दिवाळीत मूळगावी गेलेले नागरिक पुणे, मुंबईकडे परतण्यास शुक्रवारपासून (२४ ऑक्टोबर) सुरुवात होणार आहे. गावाहून परतणाऱ्या नागरिकांच्या मोटारी, खासगी बसमुळे महामार्गांवर वाहतुकीची कोंडी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर महामार्ग पोलीस, पुणे पोलीस, तसेच पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या वाहतूक विभागाने वाहनचालकांना महामार्गालगतच्या पर्यायी मार्गांचा वापर करावा आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अवलंब करण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

पुणे, मुंबईत नोकरी, व्यवसायानिमित्त अनेकजण वास्तव्यास आहेत. पुण्यात शिक्षणानिमित्त मोठ्या संख्येने विद्यार्थी वास्तव्यास आहेत. दिवाळी संपल्यानंतर २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान महामार्गावरील वर्दळ वाढण्याची शक्यता आहे. परगावाहून, तसेच परराज्यातून अनेकजण पुणे-मुंबईकडे रवाना होणार आहे. या पार्श्वभूमीवर महामार्ग पोलीस दलाचे पुणे विभागाचे पोलीस अधीक्षक विक्रांत देशमुख, पुणे पोलिसांच्या वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त विवेक पाटील यांनी वाहनचालकांना आवाहन केले आहे.मुंबई-बंगळुरू राष्ट्रीय महामार्ग, तसेच बाह्यवळण मार्गावरील वर्दळ वाढणार आहे. कोल्हापूरहून मुंबई, नवी मुंबई, ठाणे, मीरा भाईंदरकडे जाणाऱ्या वाहनांची संख्या जास्त असणार आहे. नाशिक-पुणे महामार्गावरील चाकण परिसरातून पुण्याकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहतुकीचा वेग संथ होण्याची शक्यता आहे. सोलापूरहून पुण्याकडे मोठ्या संख्येने वाहने येणार आहेत.

### सूचनांचे पालन करावे

या पार्श्वभूमीवर वाहनचालकांनी शक्यतो सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करावा. मोटारी, खासगी बसने पुण्याकडे येणे टाळावे. महामार्गावरील गर्दी आणि कोंडी विचारात घेऊन प्रवासाचे नियोजन करावे. २४ ते २७ ऑक्टोबर दरम्यान सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी पाच ते रात्री नऊ यावेळेत प्रवास टाळावा. महामार्गालगतच्या पर्यायी मार्गांचा वापर करावा. पोलिसांनी दिलेल्या नियमांचे आणि सूचनांचे पालन करावे.

दिवाळीत घरफोडी करणाऱ्या चोरट्यांचा उच्छाद

# दिवाळीत रोकड, दागिन्यांसह 42 लाखांचा ऐवज लंपास



।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळीत चोरट्यांनी उच्छाद मांडला. वेगवेगळ्या घटनेत चोरट्यांनी दागिने, रोकड असा ४२ लाख रुपयांचा ऐवज लांबविला. नगर रस्त्यावरील वाडेबोल्हाई, कोथरूड, कात्रज-कोंढवा रस्ता, तसेच हडपसर भागात घरफोडीच्या घटना घडल्या. बिबवेवाडीतील लेकटाऊन सोसायटी भागातील एका प्रसिद्ध मिठाई विक्री दुकानाचे कुलूप तोडून चोरट्यांनी दोन लाख २० हजारांची रोकड लांबविली.**

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी पूजेत मांडलेले दागिने, रोकड असा १९ लाख ८८ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लांबविल्याची घटना नगर रस्त्यावरील वाडेबोल्हाई परिसरात घडली. याबाबत एका व्यावसायिकाने लोणीकंद पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदारांचा वाडेबोल्हाई-राहू रस्त्यावर बंगला आहे.

लक्ष्मीपूजनाच्या दिवशी (२१ ऑक्टोबर) सायंकाळी व्यावसायिकाच्या कुटुंबीयांनी पूजा मांडली होती. प्रथेनुसार दुसऱ्या दिवशी पूजेतील ऐवज पुन्हा कपाटात ठेवण्यत येणार आहे. चोरट्यांनी मध्यरात्री स्वयंपाकघराच्या खिडकीची जाळी उचकटून आत प्रवेश केला. देवघरात मांडलेल्या पूजेतील सोन्याचे दागिने आणि रोकड असा १९ लाख ८८ हजार रुपयांचा ऐवज लांबवून चोरटे पसार झालेपोलिसांनी व्यावसायिकाच्या बंगल्याच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असून, पोलीस उपनिरीक्षक पालवे तपास करत आहेत.

### कोथरूड पोलिसांनी गुन्हा दाखल

कोथरूड भागात सदनिकेतून चोरट्यांनी आठ लाख दहा हजार रुपयांचा ऐवज लांबविल्याची घटना उघडकीस आली. याप्रकरणी चोरट्यांविरुद्ध कोथरूड पोलिसांनी गुन्हा दाखल केला. याबाबत एका महिलेने कोथरूड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला कोथरूडमधील लोकमान्य कॉलनीत एका सोसायटीत राहायला आहे. सदनिकेचा दरवाजा उघडा असल्याची संधी साधून चोरट्यांनी शयनगृहातील कपाट उचकटून आठ लाख दहा हजार रुपयांचा ऐवज लांबविला.

## नागरी समस्यांची सोडवणूक न करणाऱ्या गृहप्रकल्पांना पीएमआरडीएकडून नोटीस

# माण, मारुंजीतील बांधकाम व्यावसायिकांना नोटिसा!

### सुविधा नसल्याने नागरिकांच्या तक्रारी; पीएमआरडीएकडून कारवाई

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**रस्ता, आवश्यक सुविधांचा अभाव, अतिक्रमण, ड्रेनेज आणि अंतर्गत नागरी समस्यांची सोडवणूक न करणाऱ्या माण, मारुंजी, वाघोली येथील गृहप्रकल्पाना पीएमआरडीएकडून नोटीस बजाविण्यात आली आहे. तसेच समस्या न सोडविल्यास त्यांचे पुढील कामकाजही थांबविण्यात येणार आहे.**




> सोसायटीतील नागरिकांच्या तक्रारीनंतर त्याची तातडीने दखल घेतला जाणार आहे. त्या अनुषंगाने तालुक्यातील प्रत्येक सहाय्यक नगर रचनाकार यांना सूचना दिलेले आहेत. त्याचप्रमाणे आता बांधकाम व्यवसायिकांवर कारवाई सुरू आहे. नागरिकांनी तक्रारीसाठी पुढे यावे.
>
> **-अविनाश पाटील,** संचालक, विकास परवानगी विभाग

मुळशी, मावळ, वेल्हा, चाकण या तालुक्यात बांधकामे मोठ्या प्रमाणात होत आहेत. त्यात पाचशे, सातशे ते हजारो सदनिकांचे मोठे टॉवर उभारण्यात येतात. मात्र हे प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अनेक समस्या उद्भवतात. रस्ता उपलब्ध करू न देणे, सार्वजनिक जागेत उद्यान अथवा इतर सुविधा उभारणे, पार्किंग, सांडपाणी अथवा अतिक्रमण करणे अशा अनेक तक्रारी पीएमआरडीएकडे प्राप्त होत आहेत. यावर तोडगा निघत नसल्याने रहिवाशांना पीएमआरडीएच्या कार्यालयात हेलपाटे मारावे लागतात. विकास परवानगी विभागाकडून परवागनी दिल्यानंतर त्यांच्याकडून कारवाईस मर्यादा येत होत्या; तसेच बांधकाम व्यावसायिकदेखील सोसायटी हस्तांतरण केल्यानंतर ते दखल घेत नाहीत. परिणामी, आता या तक्रारीची तातडीने दखल घेण्यात येणार आहे.

विकास परवानगी विभागाच्या वतीने त्या तक्रारीची शहानिशा करण्यात येणार असून, तथ्य आढळल्यास बांधकाम व्यवसायिकाला नोटीस पाठविण्यात येणार आहे; संबंधित व्यावसायिकाचे पुढील बांधकामदेखील थांबवण्याबाबतचे आदेश दिले जातील. पीएमआरडीएच्या हद्दीमध्ये विविध ठिकाणाहून बांधकाम परवानगीबाबत अर्ज दाखल होत असतात. यापूर्वी अनेकदा संबंधित अर्जदार, आर्किटेक्ट अथवा बांधकाम व्यावसायिक नेमून दिलेल्या आराखड्याप्रमाणे बांधकाम करतो का, हे पाहिले जात नव्हते; मात्र आता एटीपीकडून स्थळ पाहणी झाल्यानंतर यावर मंजुरीबाबत प्रक्रिया सुरू केली जाईल.

# नदीच्या पात्रात मिसळतेय मैलामिश्रित पाणी!

### पिंपळे गुरव, नवी सांगवी, जुनी सांगवी या भागांमधील नागरिकांच्या तक्रारी

**। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज**

**पिंपरी-चिंचवड शहराची जीवनदायिनी अशी ओळख असलेल्या पवना नदीच्या पात्रात अनेक ठिकाणी मैलामिश्रित पाणी सोडले जाते. पिंपळे गुरव, नवी सांगवी, जुनी सांगवी या भागांमध्ये पवना नदीत मैलामिश्रित पाणी थेट नदीत सोडले जात असल्याचे दिसून येत आहे. परिणामी, परिसरात घाण व दुर्गंधी पसरली आहे. यामुळे नागरी आरोग्य धोक्यात आले आहे. महापालिका प्रशासनाने तातडीने उपाययोजना करण्याची मागणी रहिवाशांकडून केली जात आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराच्या मध्यातून पवना नदी वाहते. शहरातून वाहणाऱ्या नदीपात्राचे अंतर २४.४० किलोमीटर आहे. पिंपळे गुरव येथील लक्ष्मीनगर, भालेकरनगर येथे नागरिकांची मोठ्या प्रमाणात वस्ती आहे. या भागात सांडपाणी वाहिन्यांची व्यवस्था करण्यात आलेली आहे. मात्र, सांडपाणी वाहिन्यांमधून गळती होत असून, वाहिन्यांच्या झाकणावरून ओसंडून सांडपाणीवाहत आहे. त्यामुळे हे मैलामिश्रित पाणी थेट नदीपात्रात मिसळून पवना नदीचे प्रदूषण वाढत आहे. तसेच चिखली, जाधववाडीतील जाधव कमानीपासून गेलेल्या नैसर्गिक नाल्यामध्ये सांडपाणी सोडल्याने परिसरातील गृहनिर्माण सोसायटीधारकांसह बैठ्या घरांमध्ये राहणाऱ्यांना दुर्गंधीसह आरोग्याच्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**दुर्गंधीचा त्रास; आरोग्याचा प्रश्न**

या परिसरातून दररोज विद्यार्थी, कामगार आणि वाहनचालक ये-जा करतात. दुर्गंधी आणि घाणीमुळे रस्त्याने चालणेही अवघड झाले आहे. पिंपळे गुरवच्या मुख्य चौकामध्ये तुळजाभवानी मंदिर असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागतो. पाण्यातून येणारी दुर्गंधी आरोग्यास धोकादायक ठरत आहे. सांडपाणी थेट नदीत मिसळल्याने नदीच्या पाण्याची गुणवत्ता घसरली असून, परिसरात डासांचा प्रादुर्भाव, दुर्गंधी आणि प्रदूषण वाढले आहे. परिणामी, नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

> विद्युत विभागाच्या अभियंत्यांना स्थळपाहणी करून आवश्यक दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात येतील. सांडपाणी नदीपात्रात जाते, हे चुकीचे आहे. सांडपाणी वाहिनी, झाकणांची स्वच्छता आणि देखभाल करण्याची जबाबदारी जलनिस्सारण विभागाकडे आहे.
>
> **-अनिल भालसाकळे,** सह शहर अभियंता, विद्युत विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

> पंपिंग यंत्रणा बंद पडल्यास, वीजपुरवठा खंडित झाल्यास, तसेच तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास सांडपाणी झाकणांमधून बाहेर येण्याची शक्यता असते. पंप स्टेशनवरील संबंधित कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील.
>
> **-विनय ओव्हाळ,** कार्यकारी अभियंता, जलनिस्सारण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

### नागरिकांच्या मागण्या

- पंपिंग स्टेशनमधील गाळाची तातडीने सफाई करावी.
- सांडपाण्याच्या वाहिन्यांमधील गळती दुरुस्त करावी.
- पवना नदीपात्रात मिसळणारे सांडपाणी थांबविण्यासाठी उपाय करावेत.
- नदीकाठ स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित स्वच्छता मोहीम राबवावी.



## भूमिका

# प्रीपेड स्मार्ट मीटरचा वाद

**केंद्र सरकारच्या आरडीएसएस या वीजपुरवठा पायाभूत सुविधा विकास कार्यक्रमांतर्गत राज्यात स्मार्ट मीटर बसविण्याची योजना आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे, परंतु प्रीपेड स्मार्ट मीटरच्या विरोधात मोहीम सुरू झाली आहे.**

अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून वीज वापराबाबत अचूक आणि पारदर्शी नोंदींची व्यवस्था महावितरण सरकारी कार्यालये आणि स्वतःपासून उपलब्ध करून देत आहे. सध्या प्रीपेड स्मार्ट मीटर भारतात आसाम, बिहार, मध्यप्रदेश,जम्मू काश्मीर आदी राज्यात वापरले जात आहे. त्यासाठी केंद्राकडून आर्थिक मदत देण्यात येत आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे. त्यांना त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारे शुल्क आकारले जाणार नाही, हे आधीच स्पष्ट करण्यात आले आहे. स्मार्ट मीटरमध्ये ग्राहकांचा वीजवापर मोजला जाईल आणि दूरवर असलेल्या सर्व्हरमध्ये त्याची आपोआप नोंद होईल. आपल्या मोबाइलचा वापर हा सेवा देणाऱ्या कंपनीकडे आपोआप नोंदविला जातो. वीज ग्राहकांना त्यांचा वीजवापर दर मिनिटाला त्याच्या मोबाईल फोनवर जाणून घेता येणार आहे. अत्यंत अचूक व पारदर्शीपणे रिडिंग हे स्मार्ट मीटरचे खास वैशिष्ट्य आहे. त्याच्या वापरामुळे वीज ग्राहकांच्या मीटरचे रिडिंग चुकीचे



घेतले, रिडिंग नियमितपणे घेतले नाही, अचानक जास्त वीज वापराचे वीज बिल आले, इतका वीज वापर झाला आणि मला समजलेच नाही अशा बिलिंगबाबतच्या समस्या पूर्णपणे संपुष्टात येणार आहेत. वीज कंपनीला प्रत्येक ग्राहकाच्या विजेच्या वापराची अचूक नोंद झाल्यामुळे वीज बिल वसुली आणि वीजपुरवठ्याचे व्यवस्थापन यामध्ये क्रांतिकारी सुधारणा करता येणार आहेत. विजेचे दर ठरविण्याचा अधिकार 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगा'ला असतो. त्यामुळे हे दर महावितरण ठरवू शकत नसल्यामुळे स्मार्ट मीटर लावल्यानंतरही विजेचे दर आहेत तेवढेच राहणार आहेत. परिणामी स्मार्ट मीटरमुळे वीज महाग होईल, ६ हजार १३६रूपये किंमत असलेला स्मार्ट मीटर १२ हजार रूपयांना घेतला गेला आहे या अपप्रचाराला काहीही अर्थ नाही. मीटर बसवून देणाऱ्या खासगी एजन्सीला दहा वर्षे मीटरची देखभाल दुरूस्ती करणे, निर्मितीच्या दोषामुळे मीटरमध्ये बिघाड झाल्यास ते मोफत बदलणे, रिडिंग उपलब्ध करून देणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागणार आहेत आणि त्यासाठी एजन्सीला वेगळा मोबदला दिला जाणार आहे. स्मार्टमीटर बसविण्यासाठी महावितरण कडून १६ हजार कोटी रूपयांचे कर्ज घेण्यात येणार आहे व त्याचा बोझा ग्राहकांवर पडून वीजदरवाढ होईल अशीही अफवा पसरविण्यात आली आहे. मात्र वस्तुस्थिती अशी आहे की, स्मार्ट मीटरसाठीचे पैसे संबंधित कंपन्यांना दहा वर्षात टप्प्याटप्प्याने द्यायचे आहेत व जेवढे मीटर बसतील तेवढ्या मीटर्सचेच पैसे द्यायचे आहेत. स्मार्ट मीटरसाठी द्यावे लागणारे पैसे महावितरणला आपल्या स्वतःच्या महसुलातून देता येतील व त्यासाठी स्वतंत्र कर्ज काढावे लागणार नाही. वाणिज्यिक हानी कमी झाल्याने आणि रिटर्न ऑन इक्विटी सुधारल्याने महावितरणला परतफेड करणे सोपे जाणार आहे. स्मार्ट मीटरमुळे वीज क्षेत्राचे खासगीकरण होईल, हा अपप्रचार आहे. महावितरण ही राज्य सरकारच्या मालकीची कंपनी आहे. ही मालकी कोण्या खासगी कंपनीला हस्तांतरित करण्याचा राज्य सरकारचा कोणताही विचार नाही. वीज ग्राहकांसाठी बसविण्यात येणारे विजेचे स्मार्ट मीटर हे अचूक बिलिंग,वीजवापराची नियमित माहिती व खर्चावर नियंत्रण ठेवण्याची सुविधा यामुळे वरदान ठरणार आहेत. स्मार्ट मीटरच्या वापरामुळे भविष्यात वीजवापराच्या वेळेनुसार कमी दरात वीज मिळण्याची सुविधाही उपलब्ध करता येणार आहे.

अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञान वापरून वीज वापराबाबत अचूक आणि पारदर्शी नोंदींची व्यवस्था महावितरण सरकारी कार्यालये आणि स्वतःपासून उपलब्ध करून देत आहे. सध्या प्रीपेड स्मार्ट मीटर भारतात आसाम, बिहार, मध्यप्रदेश,जम्मू काश्मीर आदी राज्यात वापरले जात आहे. त्यासाठी केंद्राकडून आर्थिक मदत देण्यात येत आहे. स्मार्टमीटर ग्राहकांना मोफतच मिळणार आहे. त्यांना त्यासाठी प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षरीत्या कोणत्याही प्रकारे शुल्क आकारले जाणार नाही.

## प्रासंगिक »

### तेल तळतळाट

***सापेक्षता आणि वस्तुनिष्ठता या संदर्भात न्यायालयाने उपस्थित केलेले मुद्दे यंत्रणेच्या विश्वासार्हतेवरच प्रश्न उपस्थित करणारे आहेत...***

साध्या डासापासून ते डायनासॉरपर्यंत सर्वांस निष्प्रभ करण्यासाठी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प एकच एक अस्त्राचा वापर करताना दिसतात. ते अस्त्र म्हणजे आर्थिक निर्बंध. याआधी त्यांनी इराणविरोधातही त्याचा वापर केला आणि आता पहिल्यांदा ते हे अस्त्र रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्यावर उगारतात. अधूनमधून आयात शुल्क वाढीची छडीही आहेच. ट्रम्प यांच्या अन्य कृतींबाबत, निर्णयांबाबत भिन्न मते असतील. तथापि पुतिन यांच्यासारख्या निर्घृण आणि थंड रक्ताच्या नेत्याविरोधात कडक आर्थिक निर्बंध लादण्याच्या निर्णयासाठी ट्रम्प अभिनंदनास पात्र ठरतात. इतके दिवस त्यांचे पुतिन यांच्या बाबत तळ्यात-मळ्यात सुरू होते. ते आता संपले. ट्रम्प आणि पुतिन या दोन नेत्यांच्या मनोभूमिकेत मूलतःच फरक आहे. ट्रम्प यांच्या बहुतांश निर्णयांमागे अंत:प्रेरणेचा मोठा वाटा असतो. त्यामुळे आज घेतलेला निर्णय उद्या मागे घेण्यास त्यांना काही वाटत नाही.

सध्याच्या काळात पक्ष आणि पक्षसंघटना या विषयाला दुय्यम मानण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. तुम्ही आधिचा वर्ग पास झाले आणि नंतरच्या म्हणजे सध्याच्या वर्गात आले तरीही तुम्ही आधिच्याच वर्गाप्रमाणे विचार करीत असाल तर तुमचा नंतरच्या म्हणजे सध्याच्या वर्गात येऊन काय फायदा झाला?

# डॉ बाबासाहेब आंबेडकरांचा समूह विचार

आपण विभागल्या जावं असं तुम्हालाच काय कुणालाही वाटत नसते. पण तुमचं एकत्रित असणं हे एका जणाचं शल्य असतं. तो कुढत असतो. तुमच्या एकत्रित असण्याने त्याला काही करता येत नसते.डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या चळवळीत पक्ष ही संकल्पना जी त्यावेळी प्रचलित होती त्याहून पुढे ती नेत तिला अधिकाधिक व्यापक केले आहे. ही संकल्पना मैत्रीचा परिसर विस्तारित ठेवणारी आहे. सामूहिक भोजनांप्रसंगी उपस्थित असतांना त्यांचे एकंदरीत व्यक्तिमत्व हे हातात पुस्तक धरून वाचत असणारा घोटू विद्यार्थी असे मुळीच नव्हते.तर अत्यंत हसत खेळत ती पार्टी होत असे. त्यात मद्य - धुम्र पानाला थारा नसे. तरीही सगळे एकत्वाच्या आनंदभावात तादात्म्य पावत असत. पक्ष आणि संघटना असावी. तिची बांधणी करावी या पलीकडचा हा आचार असे. त्यात स्वर्थांधतेला जागाच नव्हती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कास्टस् इन इंडिया या ग्रंथात म्हणतात की; "कास्ट सिंग्युलर नसते तर ती प्लुरल असते ."



जातीयता हा ब्राम्हणी विचाराचा पाया आहे.तो भारतीय संस्कृतीत ॲमलगम प्रमाणे घुसवला गेला आहे. जात अस्तीत्व हे एका पासून दुसऱ्याला भिन्न करते. अशा प्रत्येकाने स्वतःला स्वयंभू मानणाऱ्यांवर बाहेरच्या व्यक्तीला राज करणे सोपे जाते.म्हणून संघटीत असण्याला पर्याय असूच शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा समुह विचार भारतीय ऐक्याच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त असल्याने तो घेऊनच पुढे जाता येते. पण बाबासाहेबांमुळे मिळालेले खायचे आणि मान्य मात्र करायचे नाही. अशी प्रवृत्ती कशी काय जन्माला येत आहे..! हे एक कोडेच आहे.ते लक्षात येत नाही. या विषयानुषंगाने चर्चा करताना आपण समजून घेत आहोत. मानवाच्या प्रारंभिक विकास अवस्थेस अबोधावस्था म्हणूया.ही अवस्था डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वत: धारण करीत होते.(ते पुढे येणाऱ्या स्पष्टीकरणातून लक्षात येईल) एकंदरीत आपण सारेच त्याच दिशेने जात असल्याचे त्यांचे निरिक्षण आहे. देशोदेशी निव्वळ भ्रमंती न करता प्रत्यक्ष शिक्षण घेतले. समाजाभ्यासात स्वत:ला गुंतविले. तनतमा बाळगीली नाही.आश्चर्यांहून आश्चर्ये त्यांनी अनुभवले. जगात कुठेच नाही अशी जातीप्रथा फक्त माझ्याच देशात आहे. का? का म्हणून? अशा प्रश्नांनी त्यांना बेचैन केले....अखेर, हेच माझ्या देशाचं दु:ख आहे यावर त्यांनी शिक्कामोर्तब केल. कास्टस् इन इंडीया, अँनिहिलेशन ऑफ कास्टस् द्वारे या दु:खनिराकरणाचा प्रश्न ऐरणीवर आणला .पण बथ्थड राज्यकर्ते बधले नाहीत.प्रॉब्लेम्स ऑफ रुपीज लिहून त्यांनी राज्यकर्त्यांना हादरविले.आपली अर्थनीती कुचकामी असून आता आपण काढता पाय घ्यायला हवा असे इंग्रजांना निश्चीत वाटू लागले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

शेतकऱ्यांचे महाअंदोलन

## २ नोव्हेंबरला शेतकरी नेते, अभ्यासकांची महाबैठक

# बळीराजासाठी जरांगे पुन्हा मैदानात

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**शेतकऱ्यांचा सातबारा कोरा न करता राज्यात कोणत्याही निवडणुका होऊ देणार नसल्याचा इशारा देत मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी राज्यात लवकरच शेतकऱ्यांचे महाअंदोलन उभे करण्याच्या तयारीत असून येत्या २ नोव्हेंबर रोजी सर्व शेतकरी संघटना, अभ्यासक आणि आंदोलकांची बैठक आयोजित केली आहे.**

### न्यायासाठी ऐतिहासिक आंदोलन



### शेतीला नोकरीचा दर्जा द्या!

सरकारला धारेवर धरले. आमदारांकडे हजारो कोटींच्या प्रॉपर्टी आहेत, तरी त्यांना ५ कोटी देण्यात येत आहेत. भाऊबीज निमित्त लाडक्या बहिणीला आणि लाडक्या दाजीला न्याय दिल्याशिवाय शांत बसायचे नाही, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांसाठी हमीभाव, कर्जमुक्ती, कुटुंबातील सदस्यांना नोकऱ्या आणि शेतीला नोकरीचा दर्जा देण्याची मागणी करण्यासाठी हे ऐतिहासिक आंदोलन उभे करणार असल्याचे जरांगे यांनी सांगितले.

२ तारखेला अंतरावली सराटी येथे होणाऱ्या नियोजन बैठकीला राज्यातील शेतकरी संघटनांचे नेते विजय जावंधिया,वामनराव चटप,राजू शेट्टी,अजित नवले,बच्चू कडू,रविकांत तुपकर,प्रकाश पोहरे ,कॉ. राजन क्षीरसागर,प्रशांत डिक्कर ,रघुनाथ पाटील इत्यादी नेत्यांना आणि शेती क्षेत्रातील अभ्यासकांना निमंत्रित करण्यात येणार असल्याचे जरांगे पाटील यांनी सांगितले. मराठा आरक्षणासाठी राज्यात रान पेटवणारे मनोज जरांगे पाटील आता शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मैदानात उतरले आहेत. अतिवृष्टीमुळे राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये झालेल्या मोठ्या नुकसानीनंतरही शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचली नसल्याने, जरांगे पाटलांनी थेट भाऊबीजेच्या मुहूर्तावर शेतकऱ्यांसाठी आंदोलन उभारण्याचा इशारा सरकारला दिला आहे.अतिवृष्टीमुळे राज्यात अनेक ठिकाणी शेती पाण्याखाली, तर नदीकाठच्या जमिनी वाहून गेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठेनुकसान झाले असून सरकारने जाहीर केलेल्या ३ हजार कोटींच्या मदत पॅकेजचा लाभ अजूनही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटलांनी थेट शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा ‘नांगर’ टाकण्याची घोषणा केली आहे.मनोज जरांगे पाटील यांनी म्हणाले, राज्यात अनेक ठिकाणी अधिकारीच सरकारपेक्षा मोठे झाले आहेत. जे काम करत नाहीत, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. दिलेली मदत ही तात्पुरता आनंद आहे, जसा देवेंद्र फडणवीस प्रत्येकाला तात्पुरता आनंद देतात, अशा शब्दांत त्यांनी मदतीच्या पॅकेजवर टीका केली. ते पुढे म्हणाले की, भाऊबीजेच्या दिवशी नुकसानीच्या याद्या तयार करत आहोत आणि लवकरच बैठक घेऊन राज्यात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारले जाईल. शेतकऱ्यांसाठी काम करणारे अभ्यासक, तज्ज्ञ आणि नेते यांना एकत्र बोलावून आंदोलनाची दिशा ठरवली जाईल.२ तारखेला अंतरावली सराटी येथे होणाऱ्या नियोजन बैठकीला राज्यातील शेतकरी संघटनांचे नेते विजय जावंधिया,वामनराव चटप,राजू शेट्टी,अजित नवले,बच्चू कडू,रविकांत तुपकर,प्रकाश पोहरे ,कॉ. राजन क्षीरसागर,प्रशांत डिक्कर ,रघुनाथ पाटील इत्यादी नेत्यांना आणि शेती क्षेत्रातील अभ्यासकांना निमंत्रित करण्यात येणार असल्याचे जरांगे पाटील यांनी सांगितले. अतिवृष्टीमुळे राज्यातील २९ जिल्ह्यांमध्ये झालेल्या मोठ्या नुकसानीनंतरही शेतकऱ्यांपर्यंत मदत पोहोचली नसल्याने, जरांगे पाटलांनी थेट भाऊबीजेच्या मुहूर्तावर शेतकऱ्यांसाठी आंदोलन उभारण्याचा इशारा सरकारला दिला आहे.अतिवृष्टीमुळे राज्यात अनेक ठिकाणी शेती पाण्याखाली, तर नदीकाठच्या जमिनी वाहून गेल्या आहेत.

शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठेनुकसान झाले असून सरकारने जाहीर केलेल्या ३ हजार कोटींच्या मदत पॅकेजचा लाभ अजूनही शेतकऱ्यांपर्यंत पोहोचलेला नाही. या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटलांनी थेट शेतकऱ्यांच्या आंदोलनाचा ‘नांगर’ टाकण्याची घोषणा केली आहे.मनोज जरांगे पाटील यांनी म्हणाले, राज्यात अनेक ठिकाणी अधिकारीच सरकारपेक्षा मोठे झाले आहेत. जे काम करत नाहीत, त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल केले पाहिजेत. दिलेली मदत ही तात्पुरता आनंद आहे, जसा देवेंद्र फडणवीस प्रत्येकाला तात्पुरता आनंद देतात, अशा शब्दांत त्यांनी मदतीच्या पॅकेजवर टीका केली. ते पुढे म्हणाले की, भाऊबीजेच्या दिवशी नुकसानीच्या याद्या तयार करत आहोत आणि लवकरच बैठक घेऊन राज्यात शेतकऱ्यांचे मोठे आंदोलन उभारले जाईल.

# महायुतीचा निर्णय स्थानिक स्थितीनुसार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्पष्टोक्ती; विरोधकांचा कांगावा

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आता निवडणुका झाल्यास पराभवाला सामोरे जावे लागेल अशी शंका असल्यामुळेच विरोधक निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी करत आहेत. त्यासाठीच मतदार याद्यांचे कारण पुढे केले जात आहे. मात्र, विरोधकांचा हा कांगावा निरर्थक आहे.**



### कुठे तरी फायदा होईल

कारण त्यांना आता निवडणुका अडचणीच्या वाटत आहेत. विधानसभेत आम्हाला जे यश मिळाले ती लाट अजून कायम आहे असे त्यांना वाटते. कदाचित अजून सहा महिने गेले तर काही प्रश्नांमुळे, अडचणींमुळे कुठे तरी फायदा होईल आणि आपण निवडून येऊ, असे विरोधकांना वाटत आहे.

विरोधकांनी त्यांच्या मतदारसंघात केलेला घोळ पुराव्यासकट जनतेसमोर मांडू, असा इशारा देताच आयोगाने मतदार याद्यांवर हरकती सूचना मागवल्या होत्या तेव्हा एकही हरकत का घेतली नाही ? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना केला आहे. त्याचवेळी मुंबईत महायुती म्हणूनच निवडणुकीला समोरे जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दिवाळीनिमित्त वर्षा निवासस्थानी पत्रकारांसोबत अनौपचारिक संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते. विरोधक निवडणुका पुढे ढकलण्याची मागणी करत आहेत कारण त्यांना आता निवडणुका अडचणीच्या वाटत आहेत. विधानसभेत आम्हाला जे यश मिळाले ती लाट अजून कायम आहे असे त्यांना वाटते. कदाचित अजून सहा महिने गेले तर काही प्रश्नांमुळे, अडचणींमुळे कुठे तरी फायदा होईल आणि आपण निवडून येऊ, असे विरोधकांना वाटत आहे. त्यामुळे निवडणुका सहा महिने पुढे ढकलण्याची मागणी केली जात असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. निवडणुका पुढे ढकलण्याकरता कोणतेही ठोस कारण विरोधकांकडे नाही. फक्त गैरसमज पसरवण्याकरता हा विषय मांडला जात आहे. मात्र, आम्हीही तयारी केली आहे. विरोधकांवर बॉम्ब टाकणार असून लोकसभा निवडणुकीच्या काळात त्यांना ज्या ज्या मतदारसंघात लाभ झाला ते सर्व पुराव्यानिशीलोकांसमोर मांडू, असा इशारा मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुजरातमध्ये अख्खे मंत्रिमंडळच बदलण्यात आले.

मतदारसंघात केलेला घोळ पुराव्यासकट जनतेसमोर मांडू, असा इशारा देताच आयोगाने मतदार याद्यांवर हरकती सूचना मागवल्या होत्या तेव्हा एकही हरकत का घेतली नाही ? असा प्रश्न मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना केला आहे. त्याचवेळी मुंबईत महायुती म्हणूनच निवडणुकीला समोरे जाणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.अनौपचारिक संवाद साधताना मुख्यमंत्री बोलत होते.

**बिहार विधानसभा निवडणूक**

## प्रचारात सर्व राजकीय पक्षांचे नेते उतरले मैदानात

# मुख्यमंत्रीपदासाठी तेजस्वीचे नाव!

## तेज प्रताप यादवांची प्रतिक्रिया चर्चेत



।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सर्व राजकीय पक्षांचे नेते मैदानात उतरले आहेत. महाआघाडीने आरजेडीचे नेते तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री पदाचे उमेदवार घोषित केले आहे. यावरून जनशक्ती जनता दलाचे प्रमुख आणि लालू प्रसाद यादव याचे थोरले चिरंजीव तेज प्रताप यादव यांना प्रश्न विचारण्यात आला. यार उत्तर देताना ते म्हणाले की तेजस्वी हे धाकटे बंधू आहेत त्यामुळे मी फक्त आशीर्वादच देऊ शकतो. दरम्यान त्यांच्या प्रतिक्रियेची सध्या चर्चा होताना दिसत आहे.**

तेज प्रताप यादव हे वृत्तसंस्था पीटीआयशी बोलताना म्हणाले की, "जोपर्यंत मी तेथे होतो, तोपर्यंत मी त्यांना आशीर्वाद दिले. आता लहान भाऊ आहेत तर आशीर्वादच देऊ शकतो. सुदर्शन चक्र तर चालवू शकत नाही. मुख्यमंत्री बनणे, न बनणे हे सर्व जनतेच्या हातात आहे. जनता मुख्यमंत्री बनवते. जर जनतेला वाटलं तर मुख्यमंत्री बनतील."बिहार विधानसभा निवडणुकीत तेज प्रताप यादव आणि तेजस्वी यादव हे दोघेही निवडणुकीच्या मैदानात आहेत. तेजस्वी यादव आरजेडीच्या तिकीटावर राघोपूर येथून निवडणूक लढवत आहेत. तर तेज प्रताप यादव जनशक्ती जनता दल पक्षाच्या तिकीटावर महुआ विधानसभा मतदारसंघात मैदानात आहेत. सध्या तेजस्वी यादव हे राघोपूरचेच आमदार आहेत, तर तेज प्रताप यादव हसनपूर मतदारसंघातून आमदार आहेत. मात्र तेज प्रताप यादव हे २०१५ साली महुआ विधानसभा मतदारसंघातून आमदार राहिलेले आहेत.विशेष बाब म्हणजे तेज प्रताप यादव यांच्या विरोधात तेजस्वी यादवने आरजेडीच्या उमेदवाराला तिकीट दिले आहे. तेज प्रताप यादव यांच्याविरोधात मुकेश कुमार रौशन निवडणूक लढवत आहेत. रौशन हे यापूर्वीही महुआ येथून आमदार राहिलेले आहेत. २०२० मध्ये त्यानी आरजेडीच्या तिकीटार निवडणूक जिंकली होती.बिहार विधानसभा निवडणूक ही दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी ६ नोव्हेंबर रोजी मतदान होईल, तर दुसऱ्या टप्प्यासाठी ११ नोव्हेंबर रोजी मतदान होईल. तर १४ नोव्हेंबर रोजी निकाल लागणार आहे.बिहार विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात सर्व राजकीय पक्षांचे नेते मैदानात उतरले आहेत. महाआघाडीने आरजेडीचे नेते तेजस्वी यादव यांना मुख्यमंत्री पदाचे उमेदवार घोषित केले आहे. यावरून जनशक्ती जनता दलाचे प्रमुख आणि लालू प्रसाद यादव याचे थोरले चिरंजीव तेज प्रताप यादव यांना प्रश्न विचारण्यात आला. यार उत्तर देताना ते म्हणाले की तेजस्वी हे धाकटे बंधू आहेत त्यामुळे मी फक्त आशीर्वादच देऊ शकतो. दरम्यान त्यांच्या प्रतिक्रियेची सध्या चर्चा होताना दिसत आहे.

तेज प्रताप यादव हे वृत्तसंस्था पीटीआयशी बोलताना म्हणाले की, "जोपर्यंत मी तेथे होतो, तोपर्यंत मी त्यांना आशीर्वाद दिले. आता लहान भाऊ आहेत तर आशीर्वादच देऊ शकतो. सुदर्शन चक्र तर चालवू शकत नाही. मुख्यमंत्री बनणे, न बनणे हे सर्व जनतेच्या हातात आहे. जनता मुख्यमंत्री बनवते. जर जनतेला वाटलं तर मुख्यमंत्री बनतील."बिहार विधानसभा निवडणुकीत तेज प्रताप यादव आणि तेजस्वी यादव हे दोघेही निवडणुकीच्या मैदानात आहेत. तेजस्वी यादव आरजेडीच्या तिकीटावर राघोपूर येथून निवडणूक लढवत आहेत. तर तेज प्रताप यादव जनशक्ती जनता दल पक्षाच्या तिकीटावर महुआ विधानसभा मतदारसंघात मैदानात आहेत. सध्या तेजस्वी यादव हे राघोपूरचेच आमदार आहेत, तर तेज प्रताप यादव हसनपूर मतदारसंघातून आमदार आहेत. मात्र तेज प्रताप यादव हे २०१५ साली महुआ विधानसभा मतदारसंघातून आमदार राहिलेले आहेत.

### दोन टप्प्यात होणार निवडणूक

विशेष बाब म्हणजे तेज प्रताप यादव यांच्या विरोधात तेजस्वी यादवने आरजेडीच्या उमेदवाराला तिकीट दिले आहे. तेज प्रताप यादव यांच्याविरोधात मुकेश कुमार रौशन निवडणूक लढवत आहेत. रौशन हे यापूर्वीही महुआ येथून आमदार राहिलेले आहेत. २०२० मध्ये त्यानी आरजेडीच्या तिकीटार निवडणूक जिंकली होती. बिहार विधानसभा निवडणूक ही दोन टप्प्यात होणार आहे. पहिल्या टप्प्यासाठी ६ नोव्हेंबर रोजी मतदान होईल.

# खासदाराच्या घरातील सामान बाहेर फेकलं

## सहा महिने सरकारी निवासस्थानाचा ताबा ठेवण्याचा अधिकार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**काँग्रेसचे नेते आणि माजी खासदार उदित राज यांनी शुक्रवारी गंभीर आरोप केला आहे. प्रकरण न्याय प्रविष्ट असताना देखील त्यांच्या कुटुंबीयांना नवी दिल्लीतील त्यांच्या पंडारा पार्क बंगल्यातून बळजबरीने बाहेर काढण्यात आल्याचे उदित राज म्हणाले आहेत.**

हा सरकारी बंगला माजी खासदार राज यांच्या पत्नी आणि निवृत्त आयआरएस अधिकारी सीमा राज यांना देण्यात आला होता. ज्यांनी सांगितले की त्यांनी या वर्षीच्या ३१ मे पर्यंत लायसन्स फी भरली आहे. दरम्यान हिंदूस्तान टाईम्सच्या रिपोर्टमनुसार, अद्याप बंगला खाली करण्याच्या संदर्भात सरकारकडून कोणतेही अधिकृत प्रतिक्रिया देण्यात आलेले नाही. बंगल्यातून कुटुंबीयांना बाहेर काढण्याबाबत उदित राज यांच्या पत्नी सीमा यांनी सविस्तर माहिती दिली आहे. त्यांनी दावा केला की, त्यांची सेवानिवृत्ती ३० नोव्हेंबर रोजी होती आणि त्यांनी दावा केला की त्यांना अजून सहा महिने सरकारी निवासस्थानाचा ताबा ठेवण्याचा अधिकार होता.मी लायसन्स फी भरली होती. माझे वडील खूप आजारी होते आणि





त्यांचे नुकतेच निधन झाले. मी सातत्याने डायरेक्टर ऑफ इस्टेट यांना पत्र लिहून दुसऱ्या घराची व्यवस्था करण्यासाठी काही वेळ देण्याची विनंती केली... मी ३० मे नंतर मार्केट दराने भाडे देईन असेही म्हणाले...." असे सीमा यांनी सांगितल्याचे वृत्त एएनआयने दिले आहे.इतकेच नाही तर त्यांनी असेही सांगितले की त्यांनी नवीन घर शोधण्यासाठी नोव्हेंबर अखेर किंवा डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंतचा वेळ मागितला होता. त्या पुढे म्हणाल्या की,सप्टेंबरमध्ये न्यायालयात अपील केल्यानंतर, या प्रकरणाची सुनावणी २८ ऑक्टोबर रोजी होणार होती. "ज्या दिवशी न्यायलय बंद आहेत अधिकारी मुद्दाम त्या दिवशी आले," असेही त्या म्हणाल्या. यादरम्यान उदित राज यांनी या कारवाईवर जोरदार टीका केली आहे. भाजपा नेत्यांच्या इशाऱ्यावर सामान बाहेर फेकले जात असल्याचे राज म्हणाले आहेत. "आज माझे निवासस्थान जे पत्नी सीमा राज यांच्या नावावर अलॉट केलेले आहे, ते C-1/38, पंडारा पार्क, नवी दिल्ली, या ठिकाणी एक महिन्याचा अतिरिक्त वेळ मिळावा म्हणून कोर्टाद्वारे वेळ मागण्यात आला आहे आणि याची सुनावणी २८ ऑक्टोबरला आहे.

### उदित राज यांची टीका

सोशल मीडियावर पोस्ट करत उदित राज म्हणाले की, "जे मनुवादाशी प्रमाणीकपणे लढतात, त्यांना प्रत्येक अत्याचार आणि अन्याय सहन करण्यासाठी तयार राहायला हवे. काही कथित दलित-मागासवर्गीयांचे नेते आहेत जे आरएसएस आणि भाजपशी लढण्याचे ढोंग करतात, तर ते आतून मिळालेले असतात.

# महेश बाबूच्या मराठमोळ्या पत्नीने घेतली सुधा मूर्तींची भेट

अनंत अंबानी व राधिका मर्चंट यांच्या लग्नाला अनेक सेलिब्रिटींनी हजेरी लावली होती. या लग्नासाठी राजकीय, सामाजिक, मनोरंजन, क्रीडा या क्षेत्रातील मंडळी एकाच ठिकाणी जमली होती. याठिकाणी अनेक कलाकारांनी एकमेकांच्या भेटी घेतल्या. मराठमोळी अभिनेत्री व तेलुगू सुपरस्टार महेश बाबूची पत्नी नम्रता शिरोडकर हिने सुधा मूर्ती यांची भेट घेतली. तिने फोटो शेअर करत तिचा भेटीचा अनुभव सांगितला. नम्रता शिरोडकरने नुकतीच मुंबईत अनंत अंबानी आणि राधिका मर्चंटच्या लग्नाला हजेरी लावली होती. रेखा, नयनतारा, ऐश्वर्या राय आणि ज्योतिका यांच्याबरोबरचे अनेक फोटो ती तिच्या इन्स्टाग्रामवर शेअर करत आहे. आता नम्रताने लेखिका व राज्यसभा खासदार सुधा मूर्ती यांच्याबरोबरचा फोटो शेअर केला आहे. फोटो नम्रताने सुंदर ऑफ व्हाईट ड्रेस घातल्याचं पाहायला मिळत आहे, तर सुधा मूर्ती यांनी जांभळ्या रंगाची जरी वर्क असलेली साडी नेसली आहे.नम्रता शिरोडकरने सुंदर फोटो शेअर करत त्याच्या कॅप्शनमध्ये लिहिलं,



"मी हा क्षण कधीच विसरणार नाही...या बुद्धिमान महिलेबद्दल खूप काही ऐकलं होतं आणि त्यांना भेटल्यावर जे ऐकलं होतं त्यावर माझा विश्वास बसला आहे. कमालीच्या उत्साही आहेत. इतरांना त्या भरभरून प्रेम देतात! त्यांनी माझ्या आजीचं कौतुक केलं. इतकंच नाही तर माझे पती आणि माझ्या लेकीचंही कौतुक केलं, या आठवणी आयुष्यभर जपण्यासारख्या आहेत."नम्रताच्या या पोस्टवर नेटकरी कमेंट्स करून या फोटोचं कौतुक करत आहेत. अनेकांनी सुधा मूर्ती यांचंही कौतुक केलं आहे. चाहते यावर हार्ट इमोजी शेअर करत आहेत. नम्रताच्या बहिणीने माझं स्वप्न पूर्ण झालं अशी कमेंट या पोस्टवर केली आहे. दरम्यान, अनंत व राधिकाच्या लग्नाचे सलग तीन दिवस कार्यक्रम होते व या कार्यक्रमात पाहुण्यांची मांदियाळी होती. फक्त हिंदी सेलिब्रिटीच नाही तर दाक्षिणात्य, मराठी व भोजपुरी कलाकारांनाही रिसेप्शनसाठी निमंत्रित करण्यात आलं होतं. आशीर्वाद सोहळ्याला तर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी हजेरी लावली होती. त्यांनी राधिका व अनंतला आशीर्वाद दिले होते. याशिवाय महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यपाल, उपमुख्यमंत्री अजित पवार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही कुटुंबाबरोबर उपस्थित होते. शरद पवारही या कार्यक्रमाला हजर राहिले.

## दारूच्या बाटलीवरुन नोकराला मारहाण

पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामुळे सगळेच हैराण झाले आहेत. चाहत्यांनाही हा व्हिडीओ पाहून मोठा धक्का बसला आहे. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये राहत फतेह अली खान आपल्याच नोकराला मारहाण करताना दिसत आहेत. ही मारहाण करताना टेबलावर ठेवलेली दारूची बाटली गेली कुठे, अशी विचारणाही ते करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लोकांनी राहत फतेह अली खान यांच्यावर बरीच टीका केली आहे. नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर राहत यांना चांगलेच खडेबोल सूनवायला सुरुवात केली. हे पाहताच राहत यांनी एक व्हिडीओ शेअर करत घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आहे. व्हिडीओमध्ये राहत आपल्या घरातील काम करणाऱ्या नोकराला चपलेने मारताना अन् खेचतान दिसत आहेत.

## यामीच्या घरी गुडन्यूज?

बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतमसध्या तिच्या आर्टिकल 370 या सिनेमामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच आर्टिकल 370 या सिनेमातील तिचा फर्स्ट लूक पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. याशिवाय टिझर आणि सिनेमाच्या रिलीज डेटबाबतही घोषणा करण्यात आली आहे. सिनेमाची घोषणा करण्यात आल्यानंतर अभिनेत्री यामी गौतमने पती आणि आई समवेत दिसली होती. दरम्यान आता यामीचा लूक पाहिल्यानंतर ती प्रेग्नंट असल्याच्या बातम्या व्हायरल होत आहेत. मात्र, या प्रेग्नंसीबाबत्या बातम्यांना यामीकडून कोणतेही प्रत्युत्तर देण्यात आलेले नाही. यामी गौतम आणि आदित्य धर मुंबईत एकत्रित स्पॉट झाली. यावेळी यामीने गुलाबी कलरचा सूट घातलेला दिसतोय. तर दिग्दर्शक आदित्य धर पांढऱ्या रंगाच्या कुर्त्यामध्ये यामीसोबत दिसत आहेत. दोघे एकत्रित दिसले आणि यामीच्या वेगळ्याच लूकने चाहत्यांचे लक्ष वेधलं आहे. यामी गौतम प्रेग्नंट असल्याच्या बातम्यांनी जोर धरलाय. दरम्यान यामीने गुलाबी सूटच्या ओढणीला वेगळ्या अंदाजात कॅरी करताना पाहिले. त्यामुळे सोशल मीडियावर चाहते यामी प्रेग्नंट असल्याची शक्यता वर्तवताना दिसत आहेत.



## प्रियांका चोप्राच्या पतीचं भारतात जोरदार स्वागत!

बॉलीवूडची देसी गर्ल प्रियांकाचा पती निक जोनास हा अमेरिकेतील प्रसिद्ध गायक आहे. निकचे मोठे भाऊ केविन आणि जो यांच्यासह 'जोनास ब्रदर्स' नावाचा त्यांचा बँड आहे, जो जगभरात प्रसिद्ध आहे. निक जोनास व त्याचे भाऊ केविन जोनास आणि जो जोनास हे भारतात आले आहेत. मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्सवर शनिवारी त्यांचा भव्य संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा त्यांचा भारतातील पहिला संगीत कार्यक्रम होता. भारतात निक आणि जोनास ब्रदर्सचे प्रचंड चाहते आहेत. निक गाण्यासाठी स्टेजवर येताच जमलेल्या प्रेक्षकांनी 'जीजू' असे संबोधित निकचे स्वागत केले. किंग आणि निकच्या "तू मान मेरी जान" या कोलॅबरेटेड गाण्यावर प्रेक्षक मंत्रमुग्ध होताना दिसले.जोनास ब्रदर्सचा भारतात पहिलाच कार्यक्रम असल्याने चाहते अतिउत्साही दिसत होते. शनिवारच्या या कार्यक्रमाचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होताना दिसत आहेत. यात जोनास ब्रदर्स त्यांच्या कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेताना दिसले.यातला मजेशीर भाग म्हणजे, जो आणि केविनने चाहत्यांना निकची ओळख 'जीजू' म्हणून करून दिली, त्यामुळे तिथे जमलेल्या प्रेक्षकांनी निकचा 'जीजू' 'जीजू' असा जयघोष करत स्वागत केले. २०२३ ला रीलिज झालेल्या ""तू मान मेरी जान' X 'आफ्टरलाईफ"" या गाण्यावर निक आणि किंगने एकत्र संगीत सादर केलं. कॉन्सर्टदरम्यान निक मजेशीररित्या प्रेक्षकांना म्हणाला, "भारतात परफॉर्म करण्याची आमची ही पहिलीच वेळ आहे. यात २०१८ मध्ये झालेल्या प्री वेडिंगमधला संगीत सोहळा ग्राह्य धरला जात नाही."भारतासाठी असलेल्या आपल्या भावना व्यक्त करत निक प्रेक्षकांना म्हणाला, "एक कुटुंब म्हणून आपलं या देशाशी घट्ट नातं आहे. तुमच्या या उत्साहपूर्ण स्वागतासाठी धन्यवाद. या संगीत कार्यक्रमासाठी तुमची उपस्थिती दर्शवल्याबद्दल मी तुमचा खूप आभारी आहे. या कॉन्सर्टची ही रात्र नक्कीच रोमांचक असेल, याचं मी आश्वासन देतो."

## आयशा खानने सांगितली धक्कादायक घटना

'बिग बॉस 17' या कार्यक्रमाचा ग्रँड फिनाले आज पार पडणार आहे. बिग बॉसच्या घरात वाईल्ड कार्ड एंट्री करणारी आयशा खान ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. आयशाचा एक एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ती तिच्या बालपणाशी संबंधित एक धक्कादायक घटना सांगताना दिसत आहे. आयशानं एका मुलाखतीमध्ये सांगितलं की, ती 9 वर्षांची असताना एका व्यक्तीनं तिच्यासोबत वाईट कृत्य केलं होतं.आयशा खानने अलीकडेच सिद्धार्थ कन्ननच्या मुलाखतीत तिच्यासोबत बालपणी घडलेल्या घटनेबद्दल सांगितलं. तिनं मुलाखतीमध्ये सांगितलं, "एक काका आले आणि त्यांनी मला बोलावले. मी विचारले, काय हवंय काका? त्यांनी मला एक पत्ता विचारला. मग त्यांना मी तो पत्ता सांगितला. मग त्यांनी विचारले की, मी तिथे तुला घेऊन जाऊ शकतो का? मी त्यांना होकार दिला."पुढे आयशा म्हणाली, "ते काका आणि मी एका इमारतीत गेलो. तिथून खाली येत असताना त्यांनी अचानक मला पायऱ्यांवर ढकलले. यानंतर ते माझ्यावर जबरदस्ती करू लागले. त्या क्षणी मला समजत नव्हते की, काय होत आहे. पण काहीतरी चुकीचं घडतंय हे माझ्या लक्षात येत होतं. पण नक्की काय होतंय? ते मी समजू शकले नाही. 9 वर्षाच्या मुलीला हे सर्व समजू शकत नाही. मला ओरडता येत नव्हते. त्यांनी माझ्या तोंडावर हात ठेवला. मीओरडण्याचा प्रयत्न करत होते मी त्यांना म्हणत होते, माझी आई तिथेच उभी आहे. प्लीज काका मला जाऊ द्या." यशानं पुढे मुलाखतीत सांगितलं.



## ग्लोव्ह्ज कापावे लागले

## तिलक वर्माने सांगितला भीतीदायक किस्सा

# ‘माझ्या बोटांची हालचालच होईना

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**आशिया चषक स्पर्धेच्या फायनलमध्ये भारतीय संघाच्या विजयाचा नायक तिलक वर्माने पहिल्यावहिल्या आयपीएल हंगामानंतर एका गंभीर आजाराचा सामना केल्याचं सांगितलं आहे. ‘ब्रेकफास्ट विथ चॅम्पियन्स’ या युट्यूब कार्यक्रमात गौरव कपूरशी बोलताना तिलकने या गंभीर स्वरुपाच्या आजारपणाबद्दल सविस्तर माहिती दिली.**

## ‘माझ्या सगळ्या नसा आखडल्या




‘पहिल्या आयपीएलनंतर मला तब्येत नीट नसल्याचं जाणवलं. मी हे कुणालाच आधी बोललो नाहीये. मला .. नावाचा आजार झाला होता. ही एक स्थिती असते ज्यामध्ये स्नायू पूर्णपणे झिजतात. त्यावेळी भारतीय कसोटी संघात स्थान पटकावणं हे माझं उद्दिष्ट होतं. मी डोमेस्टिक क्रिकेट खेळत होतो. इंडिया ए संघाचाही भाग होतो. त्यासाठी काही शिबिरंही आयोजित करण्यात आली होती. विश्रांतीच्या दिवशी मी जिममध्ये जाऊन व्यायाम करायचो. मला वर्ल्डकपमध्ये सगळ्यात फिट खेळाडू व्हायचं होतं. सगळ्यात चपळ आणि सर्वोत्तम क्षेत्ररक्षक व्हायचं होतं. या सगळ्या गोष्टी मनात सुरू होत्या. मी सगळं काही एकाचवेळी करत होतो पण शरीराला रिकव्हर होण्यासाठी वेळच दिला नाही. मी आईसबाथ घ्यायचो आणि झोपायचोही पण शरीराला विश्रांतीच मिळाली नाही.

शरीराला विश्रांतीची नितांत आवश्यकता होती. त्यामुळे मी रेस्ट डे च्या दिवशीही शरीराला त्रास द्यायचो. माझ्या स्नायूंवर ताण पडला आणि ते पूर्णत: झिजले’, असं तिलकने सांगितलं. तो पुढे म्हणाला, ‘माझ्या सगळ्या नसा आखडल्या आणि शरीर एकदम जखडल्यासारखं झालं. मुंबई इंडियन्स संघव्यवस्थापनाने मला साथ दिली. मी इंडिया ए साठी बांगलादेशविरुद्ध खेळत होतो. मी १०० चेंडू खेळून काढले, माझ्या डोळ्यातून पाणी वाहू लागलं. मी बॅटही उचलू शकत नव्हतो. माझी बोटं दुमडेना. नसा आखडल्या. माझं शरीर दगडासारखं झालं. मी रिटायर्ड हर्ड होऊन ड्रेसिंगरुममध्ये परतलो. माझ्या बोटांची हालचाल होईना त्यामुळे माझे ग्लोव्ह्ज कापावे लागले. मला आकाश अंबानींचा कॉल आला. त्यांनी बीसीसीआयशी संपर्क केला. बीसीसीआयनेही तत्परता दाखवत मला मदत केली. मला हॉस्पिटलला नेण्यात आलं. डॉक्टरांनी सांगितलं की मला दाखल करायला थोडा जरी उशीर झाला असता तर परिस्थिती हाताबाहेर गेली असती. धोका वाढला असता.

शरीरातलं रक्त घेण्यासाठी सुया, सीरिंजही आत जाईना. त्या तुटायच्या. माझी आई हॉस्पिटलमध्ये माझ्याबरोबर होती. ती मला खाऊपिऊ घालत असे. मी त्या अवस्थेतून बाहेर पडलो यासाठी देवाचा आभारी आहे’.या स्थितीत स्नायू मोडून पडतात. असं होताना रक्तवाहिन्यांमध्ये विषारी घटक सोडतात.

यामुळे किडन्यांवर परिणाम होऊ शकतो. मोठ्या प्रमाणावर वर्कआऊट, डीहायड्रेशन किंवा प्रचंड उष्णतेत काम करणं यांचा परिणाम म्हणून ही स्थिती ओढवू शकते. याची लक्षणं म्हणजे प्रचंड स्नायू दुखतात. अशक्तपणा जाणवतो. लघवीचा रंग गडद होतो. काहींना श्वास घ्यायलाही त्रास जाणवतो.२८ सप्टेंबर रोजी झालेल्या आशिया चषकाच्या अंतिम लढतीत तिलक वर्माच्या दिमाखदार खेळीच्या बळावर भारतीय संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानवर ५ विकेट्सनी विजय मिळवला. पाकिस्तानने प्रथम फलंदाजी करताना १४६ धावांची मजल मारली. साहिबझादा फरहानने ५७ तर फखर झमानने ४६ धावांची खेळी केली.

भारतीय संघाकडून कुलदीप यादवने ४ विकेट्स पटकावल्या. जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या. प्रत्युत्तरादाखल खेळताना, भारताची अवस्था २०/३ अशी झाली होती. या परिस्थितीतून तिलक वर्माने संघाला संकटातून बाहेर पडले. तिलकने ५३ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह नाबाद ६९ धावांची खेळी केली. तिलकने विकेट्सची पडझड रोखतानाच धावगती मंदावणार नाही याची काळजी घेतली.

### आशिया चषकाचा नायक

तिलक वर्मानेसुरुवातीला संजू सॅमसनबरोबर आणि नंतर शिवम दुबेबरोबर महत्त्वपूर्ण भागीदारी केली. तिलकलाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं.२०२२ मध्ये मुंबई इंडियन्स संघाने तिलकमधली गुणवत्ता हेरत त्याला ताफ्यात समाविष्ट केलं. तिलकसाठी मुंबई इंडियन्सने १.७ कोटी एवढी रक्कम खर्च केली. दुसऱ्या लढतीत त्याने राजस्थानविरुद्ध ३३ चेंडूत ६१ धावांची खेळी केली.

# चेल्सीच्या विजयात युवकांची चमक

## चॅम्पियन्स लीगमध्ये आयेक्सवर मात; रेयालची युव्हेंटसवर सरशी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**युवा आक्रमकपटूंच्या ऐतिहासिक कामगिरीच्या जोरावर चेल्सीने ‘युएफा’ चॅम्पियन्स लीग फुटबॉलच्या लढतीत आयेक्स संघावर ५-१ अशी मात केली. या सामन्यात चेल्सीसाठी मार्क गुयू (वय १९ वर्षे), एस्टेवाओ (१८ वर्षे) आणि टायरिक जॉर्ज (१९ वर्षे) यांनीही गोल साकारले. चॅम्पियन्स लीगच्या सामन्यात एका संघासाठी तीन किशोरवयीन खेळाडूंनी गोल करण्याची ही पहिली वेळ ठरली.**




घरच्या मैदानावर खेळताना चेल्सीने सुरुवातीपासून वर्चस्व राखले. त्यातच आयेक्सचा कर्णधार केनेथ टेलरला १७व्या मिनिटाला थेट लाल कार्ड मिळाल्याने चेल्सीची स्थिती अधिकच भक्कम झाली. पुढच्याच मिनिटाला युवा आघाडीपटू मार्क गुयूने गोल नोंदवत चेल्सीला आघाडी मिळवून दिली. यानंतर मोइसेस कैसेडोने (२७व्या मिनिटाला) चेल्सीची आघाडी आणखी वाढवली.

मात्र, चेल्सीचा बचावपटू टोसिनकडून झालेल्या चुकीमुळे आयेक्सला ३३व्या मिनिटाला पेनल्टी मिळाली. यावर वुट वेघहोर्स्टने गोल नोंदवत आयेक्सच्या पुनरागमनाच्या आशा जागवल्या. परंतु मध्यंतरापूर्वीच चेल्सीला दोन पेनल्टी मिळाल्या. यावर प्रथम एंझो फर्नांडिझ, मग एस्टेवाओने गोल केला. त्यामुळे चेल्सीला ४-१ अशी आघाडी मिळाली. उत्तरार्धात ४८व्या मिनिटाला टायरिक जॉर्जने चेल्सीसाठी आणखी एक गोल नोंदवला. यानंतर चेल्सीचेच वर्चस्व राहिले, पण त्यांना गोलसंख्या वाढवता आली नाही.

अन्य लढतीत, चॅम्पियन्स लीगमधील सर्वांत यशस्वी संघ रेयाल माद्रिदने युव्हेंटसवर १-० असा निसटता विजय मिळवला.

### आयेक्स संघावर ५-१ अशी मात

दुसरीकडे, लिव्हरपूरलने आइनट्रॅक फ्रॅन्कफर्टवर ५-१ अशी मात केली. लिव्हरपूलकडून हुगो एकिटिके (३५व्या मि.), कर्णधार व्हर्जिल व्हॅन डाइक (३९व्या मि.), इब्राहिमा कोनाटे तसेच जर्मनीतील बलाढ्य संघ बायर्न म्युनिकने क्लब ब्रूजवर ४-० असा, तर स्पोर्टिंग लिस्बनने मार्सेवर २-१ असा विजय मिळवला.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। शनिवार।

। दि. 25 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांची भावना

# आस्मानी संकटात "एक हात मदतीचा"!

## भाजपा आमदार महेश लांडगे यांचा राज्यात आदर्शवत उपक्रम



। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आस्मानी संकट डोळ्यांसमोर असताना कोणीतरी मदतीसाठी येईल आणि तो ईश्वरच असेल, असा विचार शेतकरी करीत असतो. त्यावेळी भोसरीसह पिंपरी-चिंचवडमधील असंख्य हात नेहमीच मदतीसाठी पुढे येतात. सामाजिक बांधिलकीच्या उद्देशाने हाती घेतलेला "एक हात गोधन"चा उपक्रमामुळे पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या आत्मविश्वासाला बळ मिळणार आहे, अशी भावना भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी व्यक्त केला.**

हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा भाजपा आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने मराठवाडा आणि सोलापूरसह अन्य जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांमधील गरजवंतांना पहिल्या टप्प्यात १०६ गायींचे दान करण्यात आले. त्यासाठी आयोजित केलेल्या गोपूजन सोहळ्यात प्रदेशाध्यक्ष चव्हाण बोलत होते.

### मराठवाड्यातील गरजवंत शेतकऱ्यांना पिंपरी-चिंचवडकरांकडून 106 गोधन मोफत वितरण

यावेळी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, भाजपा युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, माजी महापौर राहुल जाधव, नितीन काळजे, माजी महापौर हिरानानी घुले, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हेमंत हरहरे, भाजपा सरचिटणीस मोरेश्वर शेडगे यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी, विविध संस्था-संघटनांचे प्रतिनिधी, उद्योग-व्यापार क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आमदार महेश लांडगे म्हणाले की, २०१८-१९ मध्ये कोल्हापूर-सांगली जिल्ह्यात मोठ्याप्रमाणात महापूर आला होता. त्यावेळी आम्ही "एक हात मदतीचा" असा उपक्रम हाती घेतला. त्याला लोकसहभागातून ८० पेक्षा जास्त गाड्यांमधून मदत रवाना केली. पिंपरी-चिंचवडमध्ये हजारो लोकांनी मदत केली. शहरातील 'रेस्कू टीम' सुद्धा त्याठिकाणी कार्यरत होती.

आमच्या शहरातील नागरीक भावनिक आहेत. चिपळून-सिंधुदुर्गमध्ये निसर्ग चक्रीवादळाच्या संकटातसुद्धा आम्ही मदत नव्हे, तर कर्तव्य-जबाबदारी म्हणून मदतकार्य केले.

### राष्ट्रीयत्व व हिंदुत्त्वाचा वारसा पुढे न्यायाचा : चव्हाण

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे जगातील सर्वांत उंच शिल्प "स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण" उभारण्यात येत आहे. या शंभूसृष्टीमध्ये आयोजित केलेल्या "ऐतिहासिक मानवंदना" सोहळ्याची वर्ल्ड बूक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली. या भव्य शिल्पाच्या राष्ट्रार्पण सोहळा अतिभव्य करणार आहोत. त्या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी आपण मदत करावी, असे आवाहन आमदार लांडगे यांनी केले. त्याला प्रतिसाद देताना "देशात राष्ट्रीयत्व आणि हिंदुत्व यांचा वारसा पुढे न्यायचा असेल, तर छत्रपतींच्या नावाने उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक वास्तूपुढे नतमस्तक

आता मराठवाडा आणि सोलापूरसह अन्य जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर संकट म्हणजे आपल्या बांधवांवरील संकट आहे, अशा भावनेतून आम्ही मदतकार्य हाती घेतले. पहिल्या टप्प्यात ५१ गाड्या मदत रवाना केली. त्यानंतर आता दुसऱ्या टप्प्यात गोधन मोफत वाटप करण्याचा निर्णय घेतला, असेही आमदार लांडगे म्हणाले.

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान स्थळ वढू-तुळापूर येथील शंभूसृष्टीच्या कामासाठी रविंद्र चव्हाण यांनी पुढाकार घेतला. तसेच, पिंपरी-चिंचवड न्यायालय संकुलाच्या इमारत उभारणीबाबतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली चव्हाण यांनी सकारात्मक निर्णय घेतले, अशा आठवणींना उजाळा आमदार महेश लांडगे यांनी दिला.

> "कोणतेही पुण्य आणि संकट वाटून घेणे.." हा भोसरीकर किंवा पिंपरी-चिंचवडकरांचा गुणधर्म आहे. त्यामुळे राज्यात कुठेही नैसर्गिक आपत्ती आली की, हजारोंच्या संख्येने मदतीचे हात पुढे येतात. गोधन पूजन करुन आज १०६ गायी गरजवंत शेतकऱ्यांना मोफत देण्यात येत आहेत. मराठवाडा आणि सोलापूरसह अन्य जिल्ह्यात यापूर्वी ५० हून अधिक गाड्या जीवनावश्यक वस्तुंचे वाटप १०० हून अधिक गावांतील पूरग्रस्तांना वितरीत केले. या "एक हात मदतीचा" उपक्रमात योगदान देणाऱ्या प्रत्येक दानशूर व्यक्तींबाबत आम्ही कृतज्ञता व्यक्त करतो.
>
> - **महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

### विद्यार्थ्यांमधील विज्ञानाच्या सृजनशीलतेला प्रोत्साहन!

## शिक्षण विश्व:प्रतिभा महाविद्यालयात जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धा 2025 चे यशस्वी आयोजन

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पुणे शिक्षण विभाग माध्यमिक जिल्हा परिषद आणि कमला एज्युकेशन सोसायटी संचलित प्रतिभा ज्युनिअर कॉलेज चिंचवड यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय विज्ञान नाट्य स्पर्धा 2025 चे आयोजन करण्यात आले या स्पर्धेचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान विषयाची आवड निर्माण करणे वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे आणि सृजनशीलतेला प्रोत्साहन देणे असा होता.**



विद्यार्थ्यांनी विज्ञानावर आधारित नाट्य सादरीकरणांद्वारे सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकत विज्ञानाचे महत्त्व प्रभावीपणे मांडले नाट्यलेखन अभिनय संवादकौशल्य सर्जनशीलता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन या निकषांवर परीक्षकांनी विजेत्यांची निवड केली. न्यू इंग्लिश स्कूल लांडेवाडी या शाळेच्या किंजा इन्फनाइट या नाटकाने पहिले पारितोषिक मिळवले तर हिंदुस्तान अँटिबायोटिक्स स्कूल पिंपरी यांच्या पेटंट फ्री या नाटकाला दुसरे पारितोषिक मिळाले डिजिटल भारत जीवन सक्षमीकरण या नाटकासाठी श्री छत्रपती शिवाजी विद्यालय आणि ज्युनिअर कॉलेज भोर यांना तृतीय पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेचे परीक्षण बानी रॉय चौधरी, निर्मला नाईक आणि निशा निकम यांनी केले. प्रमुख पाहुणे डॉ. अशोक नगरकर यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. प्रमुख पाहुणे भाषणात म्हणाले की, या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाविषयी आवड प्रयोगशीलता आणि सादरीकरण कौशल्य वृद्धिंगत झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद पुणे डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की या स्पर्धेतून विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांनाही विज्ञान शिकवणे सोपे होईल.अशी प्रेरणा मिळेल विशेष उपस्थिती म्हणून जिल्हा विज्ञान पर्यवेक्षक विराज खराटे हे उपस्थित होते.

## आमदार शंकर जगताप यांच्या प्रयत्नातून

# चिंचवड विधानसभेत दिवाळी गिफ्ट!

## राज्य शासनाकडून विविध कामांसाठी 12 कोटींचा निधी मंजूर

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांच्या विशेष प्रयत्नातून राज्य शासनाकडून राबविलेल्या जाणा-या विविध योजनांमधून सुमारे १२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीतून मतदारसंघातील नागरिकांच्या सेवा-सुविधांशी निगडीत कामे होणार आहे. दिवाळी सणाच्या निमित्ताने एकप्रकारे हे चिंचवड विधानसभेत दिवाळी गिफ्ट मिळाले असून हा शासन निधी पिंपरी-चिंचवड शहरासोबतच विशेषतः वाकड, पुनावळे,मामुर्डी आणि किवळे या झपाट्याने वाढणाऱ्या भागाला अधिकचा निधी देऊन तेथील विकासाला हातभार लागला आहे.**



### वाकड, पुनावळे,मामुर्डी आणि किवळे या गावांसाठी अधिकचा निधी

राज्यातील महायुती सरकार विकासाचे उदिष्ट साध्य करणारे व जनतेच्या मनातील आशा-आकांक्षा पूर्ण करणारे आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे भाजपचे आमदार शंकर जगताप यांच्याकडून सातत्याने शासनाच्या माध्यमातून विविध कामांसाठी निधी उपलब्ध करून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. आमदार शंकर जगताप यांच्या प्रयत्नातून दिवाळी सणाच्या पुर्वसंध्येला शासनाकडून चिंचवड विधानसभेतील अनेक कामांसाठी निधी मंजूर करण्यात आला

महानगरपालिका क्षेत्रात मूलभूत सोई-सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद योजनेअंतर्गत चार महत्वकांक्षी कामांसाठी ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये रावेत येथे सुसज्ज बहुउद्देशीय इमारत बांधणे, मामुर्डी येथील मनपाच्या जागेत क्रीडासंकुल उभारणे, वाकड वेणूनगर येथे क्रीडा संकुल उभारणे, किवळे येथीलजागेत राष्ट्रीय दर्जाचे भारतरत्न उद्यान विस्तारीकरण करणे या मोठ्या कामांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात अधिसूचित विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी ५ कोटी रुपयांचा निधी शासनाकडून मंजूर करण्यात आला आहे. यामध्ये वाकडमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी सामाजिक सभागृह बांधणे, क्रीडासंकुल उभारणे.

जलतरण तलाव बांधणे, टेनिस कोर्ट तयार करणे, तसेच पुनावळेमध्ये सभागृह, वाचनालय, विरंगुळा केंद्र बांधणे आणि सांगवी परिसरात विविध सुशोभिकरणाच्या कामांचा समावेश आहे.

> "वाढत्या शहरीकरणामुळे नागरिकांच्या मूलभूत सोयी-सुविधांची गरज प्रचंड वाढली आहे. शासनाकडून मंजूर झालेला हा १२ कोटींचा निधी म्हणजे विकसित आणि स्मार्ट चिंचवड मतदारसंघाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण ठरेल. विशेषतः वाकड, पुनावळे, रावेत, मामुर्डी आणि किवळे या झपाट्याने विकसित होत असलेल्या भागातील नागरिकांना या कामांचा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ होईल. खेळाडू, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि युवकांसाठी निर्माण होणारी नवीन केंद्रे ही आरोग्यदायी, सशक्त आणि विकसित चिंचवडच्या' निर्मितीकडे एक ठोस पाऊल आहे. शासन निधीचा योग्य वापर करून प्रत्येक नागरिकापर्यंत विकास पोहोचवणे, हेच आमचे ध्येय आहे."
> —**शंकर जगताप,** आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजनेअंतर्गत १४ कामांसाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला. त्यापैकी २० लाख रुपयांचा निधी या कामांसाठी उपलब्ध देखील करून देण्यात आलेला आहे. या अंतर्गत किवळे एमबी कॅम्प झोपडपट्टीत पाण्याची लाईन, ड्रेनेज लाईन टाकणे, वाचनालय उभारणे, काँक्रिटीकरण करणे, सभा मंडप बांधणे, तसेच नागसेन नगर झोपडपट्टी येथे वाहतूक बेटाचे सुशोभीकरण करणे, नवीन स्वच्छतागृह उभारणे, पिंपळे गुरव लक्ष्मीनगर येथे बुद्धविहाराचे सीमाभित व विहारात अभ्यासिका तयार करणे, वेताळनगर झोपडपट्टी बौद्ध विहार परिसरात विविध कामे करणे, थेरगाव जगतापनगर येथील दलितवस्ती परिसरात ड्रेनेज लाईन टाकणे आणि राजीव गांधीनगर पिंपळे गुरव झोपडपट्टीत ड्रेनेज लाईन टाकणे या कामांचा समावेश आहे.

## दिवाळीनंतरही अधिकारी कर्मचारी ‘हॉलिडे मूड’मध्ये

## महापालिका प्रशासकीय भवनांमध्ये शुकशुकाट

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिवाळी सुट्ट्यांचा आनंद अजूनही संपलेला नसल्याचे चित्र पिंपरी महापालिकेच्या प्रशासकीय भवनांमध्ये दिसून येत आहे. सुट्ट्या संपून कार्यालयीन कामकाज सुरू झाले खरे मात्र अनेक विभागांमध्ये अद्याप कामकाजाची गती मंदावलेली आहे. सकाळपासून कार्यालय खुले असले तरी खुर्च्या रिकाम्या, फाईलींचा ढीग तसाच, आणि नागरिक प्रतीक्षेत असा शुकशुकाटाचा माहोल प्रशासनात दिसतो आहे.**



महापालिकेच्या विविध विभागांत दिवाळीपूर्वी सुट्ट्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. मात्र, सुट्टीनंतर कामावर परतल्यानंतरही अनेक कर्मचारी आणि अधिकारी ‘हॉलिडे मूड’मधून बाहेर आलेले दिसत नाहीत. काहीजण उशिरा कार्यालयात दाखल होत असून, काहींनी अजून रजा वाढविल्याचे आज दिसून आले. त्यामुळे नियमित कामकाजावर परिणाम होत आहे.

नागरिकांना जन्म-मृत्यू दाखले, परवाने, कर भरणे, तसेच बांधकाम संबंधित परवानग्यांसाठी महापालिकेत येऊन अनेकदा रिकाम्या हाताने परत जावे लागत आहे. “दिवाळी नंतर तरी कामे सुरू होतील असे वाटले, पण अजून काही फरक पडलेला नाही,” असे एका नागरिकाने सांगितले.

“सुट्टीनंतर सर्व विभागांनी कामात गती पकडावी, यासाठी सूचना देण्यात आल्या आहेत. कामकाज पूर्वपदावर आणण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील. असे प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले आहे.

www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

# EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# Admission Open

## FOR 2026 – 27

## Nursery – Std X

- **CBSE** Curriculum
- **Separate Sports Teachers** for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with **AV Facilities**
- **Skill Development Programs** including:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on **Holistic Development**



**Enroll Now!**

Sunday Open: From 10 AM to 1 PM

**Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!**

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune

www.rklgis.org

RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs:
  Robotics
  Dance, Music, Speech & Drama
  Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune